# भारत की कम्युनिस्ट पार्टी(माओवादी)
# COMMUNIST PARTY OF INDIA(MAOIST)

30 एप्रील 2014 प्रसिद्धी पत्रक

## दलित व महिलांना अपमानीत करणाऱ्या ब्राम्हणवादी व्यवस्थेला हाणून पाडा!
## रामदेवबाबाच्या देशभर पसरलेल्या ब्राम्हणवादी विषवल्लीच्या जाळ्याला उपटून फेका!
## भाजपाचे संकटमोचन बणलेल्या दलितांतिल रामांना राजकिय पटलावरुन हद्दपार करा!

कधी नव्हे इतक्या खालच्या पातळीवर जावून लोकसभेच्या निवडणूकीचा प्रचार सर्वच राजकिय पक्ष करित आहे. एकाचाही देशव्यापी किंवा सर्व समावेशी दृष्टिकोण नाही. एकाही पक्षाने किंवा नेत्याने देश किंवा जनतेचे कोणतेही मुद्दे समोर मांडले नाही. कॉंग्रेस व भाजपा तसेच इतर सर्वांचे यावर कमालिचे एकमत आहे. वास्तविकपणे जनतेचे यांना काहीच घेणे–देणे नाही. लोकशाहीचे ढोंग अबाधीत ठेवण्याकरिता निवडणूका घेत आहेत. या निवडणूकीतुन जनतेवर दमन व शोषण करणारे निवडल्या जातिल.

जनतेला कोण किती अपमानीत करु शकते, कोण किती भूलावणी देवू शकते, कोण किती चिथावनी देवू शकते, कोण किती फुट पाडून आपले फावते करुन घेवू शकते याची स्पर्धा संसदीय पक्षांमध्ये चालू आहे. मोदीला मते मागण्याकरिता रामदेव बाबा दलितांचा व महिलांचा अपमान करण्यास मागे पूढे पाहात नाही, गिरीराज किशोर मोदीला मते देणार नसाल तर पाकिस्थानात जा म्हणतात, तर फारुख अब्दुल्ला जनतेला समुद्रात डूब मरण्याची भाषा बोलतो. मुलायम बलात्कारींना पाठबळ देतो. युवराज राहूल जून्याच घोटाळेबाज व गुन्हेगारांचे पाठराखन करतो. ज्या धोरणांव्दारे देशाचा कारभार चालतो त्यावर एकही नेता शब्द काढत नाही कारण सर्वांचे धोरणे एकच आहे. साम्राज्यवाद्यांनी आखून दिलेल्या धोरणांचीच अमंलबजावणी सर्व करणार आहे. धोरणात्मक विरोध नाही व जर यावर बोलले तर जनतेसमोर पितळं उघडे पडणारं करिता आपसी संगनमताने वैयक्तिक भांडखोरीचे रणांगन आखून त्या जाळयात जनतेला अटकविल्या जात आहे. 'तु मला शिव्या दे मी तुला देणार व दोघे मीळून जनतेला थापा देवू.' अशी साम्राज्यवादी पॉलीसी मेकर्सनी 16 व्या लोकसभेच्या निवडणूकीची जी स्क्रिप्ट लिहीली त्यावर राहूल व मोदी अभिनय करित आहे. देशाचा कारभार सांभाळण्यास लाळ गाळीत असलेल्या या नेत्यांमध्ये एकाचीही पात्रता देशाचे नेतृत्व करण्याची नाही. गांव किंवा मोहल्यातील दोन लोकांचे झगडे चालावे तसे हे नेते आंपसांत वैयक्तिक पातळीवर उतरुन वक्तव्य करित आहेत. त्यांचे बौध्दीक व नैतिक दृष्टया दिसत असलेले पतन हे नवउदारवादी धोरणांचाच परिपाक आहे. त्यांनी निर्माण केलेल्या व्यवस्थेत अश्याच नेत्यांचे उत्पादन होणार. हीच त्यांची खरी पात्रता आहे. त्यात रामदेवबाबा ने आपली औकात उघडपणे दाखवून दिली एवढेच. मोदी गिरोह दलितांचा उघडपणे अपमान करते तर राहूल दलितांना एस्कॅपीजम शिकवीते. दोघेही दलित विरोधी. राहूल–सोनीया नेतृत्वातील सं.प्र.ग. ने लक्ष्मीपूर बाथे आणि बथानी टोला येथिल दलितांचे हत्याकांड करणाऱ्या सर्वणांना मोकळे सोडले. यापैकी कोणीही जातीअंत करण्यास तैयार नाही. उलट जाती पाहून उमेदवार उभे केले आहे. हे दोन्ही कैम्प जातीवादी आहेत.

रामदेव चे बोल केवळ दलितच नाही तर संपुर्ण महिलांना अपमानीत करणारे आहे. हे दलित व महिलांवरील वाढलेल्या हल्यांचे ज्वलंत उदाहरण आहे. करिता जनतेने बौध्दीक व नैतिक दृष्टया पतन झालेल्या नरेंन्द्र मोदी किंवा राहूल गांधी यांच्या जाळयात न फसता आत्मसम्मानाने जगावे व त्याकरिता रामदेव आणि तत्सम ब्राम्हणवादी विचारांच्या सर्वांचा निषेध करित त्यांना जमीनदोस्त करण्यास लडाकू जनआंदोलन ऊभारावे.

रामदेवचे सामंती विचाराचे प्रदर्शन ही भारतीय सत्ताधारी वर्गाची त्यांच्या आजच्या संकटाच्या घटकेची गरज आहे. रामदेव मात्र एक हिमनगाचे टोक आहे. त्यामागे कार्पोरेट घराण्यांच्या पाठबळावर मोदी गॅंग हे सर्व नेटवर्क सांभाळत आहे. कॉंग्रेसच्या संगनमतानेच याचे नेपत्थ तयार केल्या गेले आहे. भांडवलशाहीच्या आर्थिक संकटामुळे जनता हवालदिल झाली आहे.; कामगार व शेतकरी वर्गापूढे जीवन जगण्याचा प्रश्न उभा ठाकला आहे.; रोजगार शुन्य भांडवली गुंतवणूकी मुळे युवा पिढीचे भविष्य अंधःकारमय झाले आहे.; देशभर जनते मध्ये व्यवस्थे विरोधात आक्रोश उठला आहे.; माओवादी पक्ष या व्यवस्थेला विकल्प बणून उभा ठाकला आहे; जनता माओवादी पार्टीच्या नेतृत्वात सशस्त्र संघर्ष करित आहे.; व हजारो जनता प्राणची आहुती देत नवजनवादी क्रांतिचा संघर्ष पूढे घेवून जात आहे. या अटीतटीच्या राजकिय परिस्थितीला घाबरुन सत्ताधारी वर्गाने भारतीय जनते विरुध्द युध्द सूरु केले आहे. सत्ताधारी वर्गाची ब्राम्हणी विचारधारा अशा वेळेस तिचे उग्र रुप धारण करुन दलित, आदिवासी, महिलां

व शोषीतांना दाबण्यास आक्रमकतेने पूढे येत आहे. रामदेवबाबा सत्ताधारी वर्गाव्दारे चालू असलेल्या याच दमन मोहिमेची अमंलबजावनी करित आहे. हे सर्व काही नियोजित आहे. हे अत्यंत निंदनिय आहे व याचा आम्ही निषेध करतो.

संविधानात जनतेला असलेले सर्व लोकशाही अधिकार तथाकथित सुरक्षेच्या नावांवर हिसकावून घेतले आहे. वैयक्तिक जीवनापासून तर सामाजीक व राजकिय सर्व जीवनकार्य पोलीसांच्या कन्ट्रोल मध्ये अर्थात मुठभर दलाल भांडवलदार व जमीनदार वर्गातिल लोकांच्या कन्ट्रोल मध्ये आणल्या गेले आहे. जनतेकरिता राज्य आतंकवाद हा सर्वात मोठा धोका बणून उभा ठाकला आहे. निवडणूकीचे ढोंग सुध्दा करण्यास जनतेला धमकविन्याचे सत्र राज्य मशनरी व्दारे चालू आहे. महाराष्ट्रात 'मते दिली नाही तर पाणी मिळणार नाही' अशी धमकी उपमुख्यमंत्री अजित पवार देत आहे. गडचिरोली मध्ये तर मतदान न केल्यास पोलिस कार्रवाईची धमकी गांवागांवात पोलिस एजंट पाठवून दिल्या गेली. तर छत्तीसगढ़ मध्ये रमनसिंगाने 500 गुप्त कर्मचारी पाठवून जनतेला धमकी दिल्या कि 'जर मतदान केले नाही तर राशनच्या दुकानात अनाज मिळनार नाही.' जनते मध्ये दहशत पसरवून मतदान करायला भाग पाडत आहे.

गमावून बसलेल्या सर्व लोकशाही अधिकाराचा सर्वात प्रथम व जास्त फटका दलितांना व महिलांना बसत आहे. नौकरीतुन प्रथम कपात यांनाच व्हावे लागत आहे तर नवीन नौकरित यांचा नंबर सर्वात शेवटी आहे. भरदिवसा बलात्कार व उघडपणे दलितांचा अपमाण व दलितांवरील वाढलेले हल्ले हे सत्ताधारी वर्गाच्या धोरणांचाच एक भाग आहे. दलाल नौकरशहा भांडवलदार व जमीनदार वर्ग ज्यांची विचारधारा ब्राम्हणवादी आहे व ते जाणीव पुर्वक जातियवादी व्यवस्थेला पोसत आहेत. 'समाजात फुट पाडून राज्य करने' हे त्यांचे परंपरागत धोरण अत्याधुनिक जनसंपर्काच्या साधनांव्दारे नव्या रुपाने अमंलात आणीत आहेत. सनातनी ब्राम्हणवादी विचार व जातीय व्यवस्थेला खतपानी घालनारे बाबांचे दरबार भरविण्यास भाजपा व कॉंग्रेस दोन्ही आघाडीवर आहेत. पंतप्रधान पदावर असतांना अटल बिहारी वाजपेयी आसारामबापूच्या प्रवचनास आवार्जुन हजेरी लावत होते. आसाराम मुलिंवर बलात्कार करित होते हे आता जगजाहिर झाले आहे. तर कित्तेक बाबाचे आश्रम कॉंग्रेसच्या आशिर्वादाने देशभऱ्यात चालू आहे. भारतीय सत्ताधारी वर्गाने जनतेमध्ये माघासलेले विचार पसरविण्याकरिता दांभीक बाबांचा सुळसुळाट पसरविला आहे. प्रतिगामी विचारांना पसरविणारे टीव्ही चॅनल्स सर्रास चालू आहे. रामदेवच नाही तर मुळात ही व्यवस्थाच दलित व महिलां विरोधी आहे.

एकीकडे रामदेव दलितांचा खुला अपमान करतो तर दुसरीकडे रामदास आठवले, रामविलास पासवान, व उदित राज ('रामराज' खरे तर यांची ब्राम्हणवाद्यांसोबतची युती बघता त्यांच जून नांवच शोभतय) रामदेवाच्या कंपू मध्ये आहेत. *गुलामी करणाऱ्या पेक्षा गुलामी सहन करनारा जास्त गुन्हेगार असे म्हणतात. मग गुलामातुनच जेंव्हा गुलामी करणाऱ्यांना साथ देतात तर त्यांना काय म्हणावे.* रामदेवापेक्षाही जास्त गुन्हेगार हे दलितांतिल तिन 'राम' आहेत. जे भाजपाचे हणूमान (संकट मोचन) बणले आहेत. 'रामराज्य' म्हणजे दलित गुलामी स्थापीत करण्यास साथ देत आहेत. दलित अस्मितेचा सौदा स्वतःचे घरे भरण्यास करित आहेत. हे ब्राम्हणवाद्यांचे हत्यार बणले आहेत. त्यांनी बाबासाहेबांच्याच विचारांच्या अगदी उलट जावून जातिअंताच्या चळवळीला बोथट केले. दलित शक्तिला क्रांतिकडे वळू न देण्याकरिता हे सत्ताधारीवर्गाचे एजंट म्हणून दलितांमध्ये काम करित आहेत. आता वेळ आली आहे या दगाबाज नेत्यांना राजकिय व सामाजिक जीवनातून हद्दपार करुन त्यांना त्यांची जागा दाखविण्याची. तेंव्हा रामदेवापासून—रामदासा पर्यंत पसरलेल्या या ब्राम्हणवादी विषवल्लींना उपटून फेकने गरजेचे झाले आहे. तेंव्हा प्रश्न केवळ रामदेवाने माफी मागून सुटनार नाही तर ब्राम्हणवादी व जातियवादी विष पसरविणारे त्यांचे कोटयावधी रुपयांची संपत्ती असलेले सर्व आश्रम जप्त करण्याकरीता, सनातनी—ब्राम्हणशाही विचार व जातियवादी ढाचॉंला जोपासणारे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व त्यांचे सर्व घटक संघटन व तत्सम विचारांचे सर्व आश्रम व संघटनांवर बंदी घालण्याकरीता, दलितांनी, महिलांनी व आम जनतेनी लडाकू संघर्ष उभाराण्याशिवाय दुसरा उपाय नाही. करोडो रुपयांची माया असलेल्या बाबा रामदेवाला सत्तेचे पाठबळ आहे. त्याला केवळ जनआंदोलना व्दारेच उपटून फेकू शकतो. जातिअंताचा संघर्ष हा खऱ्या लोकशाही करिता देशभर चालू असलेल्या क्रांतिकारी जनयुध्दाचा अविभाज्य भाग आहे. करिता महाराष्ट्रातील माओवादी पार्टीच्या नेतृत्वातील सर्व संघटनांना, कार्यकर्त्यांना, समर्थकांना दलितांवरील या अपमानाच्या निषेधात संघर्ष करण्याचे आवाहन करित आहोत. त्याचप्रमाणे सर्व शोषीत जनतेला व विशेषतः दलितांना संघटीत करुन जातिअंताचा संघर्ष तिव्र करण्याचे आवाहन करित आहो.

सह्याद्री

सह्याद्री
सचिव, महाराष्ट्र राज्य समिती